सकाळ

कुडाळ : रवळनाथने दत्तक घेतलेल्या पूजा राणेला मदत देताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, अशोक येजरे, श्री. मार्गी.
(छायाचित्र : अजय सावंत)

रवळनाथ हौसिंगतर्फे मसदेतील मुलगी दत्तक

सकाळ वृत्तसेवा

कुडाळ, ता. १ : डॉक्टर बनण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी निघालेल्या मसदे (ता. मालवण) येथील पूजा राणे या हुशार मुलीला दत्तक घेतले आहे. तिच्या पुढील शिक्षणाचा खर्चही श्री रवळनाथ हौसिंग करणार आहे. बुधवारी (ता. ३०) तिला १५ हजारांची आर्थिक शैक्षणिक मदत देण्यात आली.

पुजाच्या घरची परिस्थिती अतिशय बेताची आहे, वडील सुधाकर राणे हे मणक्याच्या आजाराने त्रस्त असून त्यांच्यावर शस्त्रक्रिया झाली आणि तरुण वयातच ते जायबंदी झाले आहेत. आता संसाराची जबाबदारी एकट्या आईवर पडली आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत पूजाने दहावीपर्यंत शिक्षण पूर्ण केले. आईला स्वयंपाक कामात मदत करत तीने एसएससी परीक्षेत ९४ टक्के गुण मिळवून ॲड. गुरुनाथ कुलकर्णी न्यू इंग्लिश स्कूल माळगाव या शाळेत प्रथम तसेच मालवण केंद्रात द्वितीय येण्याचा बहुमान मिळविला. तिने न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कसाल कॉलेजमध्ये विज्ञान शाखेत प्रवेश घेतला आहे व तिला डॉक्टर बनायचे आहे. तिचे हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स को ऑप मल्टी स्टेट आजरा या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले व संचालक मंडळाने पावले उचलली आहेत. तिला कुडाळ शाखेच्यावतीने तात्काळ १५ हजाराची मदत देण्यात आली.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष चौगुले, बॅरिस्टर नाथ पै विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक अशोक येजरे, ॲड. गुरुनाथ कुलकर्णी न्यू इंग्लिश स्कूल माळगावचे मुख्याध्यापक रमेश मार्गी, सहायक शिक्षक सागर मिसाळ, तुकाराम गिरी, कुडाळ हायस्कूल ज्युनिअर कॉलेजचे उपमुख्याध्यापक व संचालक मनोहर गुरबे, आवळेगाव हायस्कूलचे शिक्षक दशरथ काळे, रवळनाथचे शाखाधिकारी विक्रम जांभेकर, दिव्या बांदेकर, मनीष परब, साईल नानचे आदी उपस्थित होते.

Sindhudurg, Main
02/10/2020 Page No. 5

पूजाच्या 'स्वप्ना'च्या पंखांना 'रवळनाथ'ने दिले आर्थिक बळ

मसदेतील पूजा राणेला बनायचंय डॉक्टर : होतकरू व हुशार मुलगी : पुढील उच्च शिक्षणासाठी घेतले दत्तक

प्रतिनिधी
कुडाळ

डॉक्टर बनण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी निघालेल्या मालवण तालुक्यातील मसदे येथील पूजा सुधाकर राणे या होतकरू व हुशार मुलीला दत्तक घेऊन पुढील शिक्षणाचा खर्च श्री रवळनाथ हाऊसिंग करणार आहे. तिला तात्काळ पंधरा हजार रु. ची आर्थिक शैक्षणिक मदत देण्यात आली.

मसदे गावातील आवळदेवाडी येथील एका शेतकरी कुटुंबात पूजाचा जन्म झाला. तिच्या घरची परिस्थिती अतिशय बेताची आहे. वडील सुधाकर राणे अल्पभूधारक शेतकरी तसेच मोलमजुरी करून चरितार्थ चालवित असतानाच २०१८ साली मणक्याच्या आजाराने त्रस्त झाले. त्यांच्यावर शस्त्रक्रिया झाली आणि तरुण वयातच ते जायबंदी झाले आहेत. आता संसाराची जबाबदारी एकट्या आईवर पडली आहे.

अशा प्रतिकुल परिस्थितीत पूजाने दहावीपर्यंत शिक्षण पूर्ण केले. ३ मार्च २०२० रोजी दहावी परीक्षा जाहीर झाली आणि १ मार्च २०२० रोजी पूजा आपल्या आईला स्वयंपाकघरात मदत करीत असताना विळीवर तिच्या हाताचे बोट कापले गेल्याने तीन टाके घालावे लागले. अशा

कुडाळ : 'रवळनाथ'ने दत्तक घेतलेल्या पूजा राणेला मदत देताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले व अशोक येजरे. बाजूला रमेश मार्गी, शिक्षक व कर्मचारी.

जखमी अवस्थेत तारेवरची कसरत करीत तिने पेपर दिले आणि विशेष म्हणजे अशा प्रतिकुल परिस्थितीत पेपर लिहून दहावीच्या परीक्षेत ९४ टक्के गुण मिळवून ॲड. गुरुनाथ कुलकर्णी न्यू इंग्लिश स्कूल (माळगाव) या शाळेत प्रथम, तर मालवण केंद्रात द्वितीय येण्याचा बहुमान मिळविला.

घरची परिस्थिती प्रतिकूल

घरची परिस्थिती प्रतिकूल असल्याने पुढील उच्च माध्यमिक शिक्षण ती हेदुळ येथे आत्याच्या घरी राहून पूर्ण करणार आहे. न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कसाल कॉलेजमध्ये विज्ञान शाखेत तिने प्रवेश घेतला आहे. तिला डॉक्टर बनायचे आहे. तिचे हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी श्री रवळनाथ हाऊसिंग फायनान्स को-ऑप. मल्टीस्टेट आजरा या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले व संचालक मंडळाने पावले उचलली आहेत.

तात्काळ पंधरा हजारांची मदत

तिला कुडाळ शाखेच्यावतीने तात्काळ पंधरा हजारांची मदत देण्यात आली. एम. एल. चौगुले, बँ. नाथ पै विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक अशोक येजरे, ॲड. गुरुनाथ कुलकर्णी न्यू इंग्लिश स्कूल (माळगाव) चे मुख्याध्यापक रमेश मार्गी, सहाय्यक शिक्षक सागर मिशाळ, तुकाराम गिरी, कुडाळ हायस्कूल ज्युनिअर कॉलेजचे उपमुख्याध्यापक मनोहर गुरबे, आवळेगाव हायस्कूलचे शिक्षक दशरथ काळे, रवळनाथचे प्रभारी शाखाधिकारी विक्रम जांभेकर, दिव्या बांदेकर, मनीष परब, साईल नानचे आदी उपस्थित होते.

येजरे म्हणाले, रवळनाथ हाऊसिंग केवळ कर्ज वाटप व नफा मिळविणे हे उद्दिष्ट ठेवून येथे आलेली नाही, तर सामाजिक व शैक्षणिक दृष्टीकोन जोपासून या संस्थेने गेल्या सहा महिन्यांत स्तुत्य उपक्रम राबविले. मार्गी म्हणाले, पूजासारख्या होतकरू मुलीला रवळनाथने दत्तक घेऊन मोठा आधार दिला आहे. तिचे डॉक्टर होण्याचे स्वप्न 'रवळनाथ' नक्कीच पूर्ण करेल.

तरुण भारत Fri, 02 October 2020
https://epaper.tarunbharat.com/c/55399200